महाराष्ट्राचे लोकप्रिय दैनिक
पुण्य नगरी
कोल्हापूर मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२५

# सतीश तांदळे यांची निवड



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर यांच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून सतीश तांदळे यांची निवड करण्यात आली आहे. इंग्रजी भाषा व साहित्य हा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी ही निवड करण्यात आली असून इंग्रजी विषयातील अनेक तज्ज्ञ या अभ्यास मंडळावर आहेत. सतीश तांदळे यांची ही निवड २०२४ - २४ आणि २०२६-२७ या शैक्षणिक वर्षांसाठी करण्यात आलेली आहे. उदयोन्मुख युवा लेखक, अभिनेता व दिग्दर्शक म्हणून सतीश तांदळे परिचित आहेत.

/२०२५



# मानवातील कौशल्य पूर्णतेमुळे जीआयएस प्रणाली व्यवस्थित काम करू शकते : डॉ. उबाळे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवातील कौशल्य पूर्णतेमुळे जीआयएस प्रणाली व्यवस्थित काम करू शकते, असे प्रतिपादन डॉ. जी. एस. उबाळे यांनी केले. विवेकानंद महाविद्यालय येथे प्राध्यापक प्रबोधनीच्या वतीने आयोजित 'जीआयएस सुदूर संवेदनांचा परिचय आणि उपयोजन'या विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख प्रा. एस. पी. थोरात होते.

व्याख्यानात डॉ. उबाळे यांनी प्रारंभी भूगोलाची व्याख्या सांगून जीआयएस ही संकल्पना स्पष्ट केली. जीआयएसद्वारे भौगोलिक क्षेत्रामध्ये कोणकोणती कामे चालतात याविषयीची उदाहरणे दिली.

प्राध्यापक प्रबोधिनीचे समन्वयक प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रस्ताविक केले. डॉ. डी. बी. दांगट यांनी आभार मानले. प्रा. अश्विनी खवळे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे कार्यक्रमासाठी मार्गदर्शन लाभले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्रा. ए. बी. वसेकर, डॉ. प्रदीप पाटील, रजिस्ट्रार आर. बी. जोग आदी उपस्थित होते.

पुढारी

माघ, कृ. १२, शके १९४६, श्री शिवशक ३५१
मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२५

# जीवनात यश मिळविण्यासाठी चिकाटी, संयम आवश्यक : प्राचार्य कुंभार

**कोल्हापूर :** विद्यार्थी दशेत सर्व विद्यार्थ्यांनी सोशल मीडियापासून दूर राहावे. जीवनात यश मिळविण्यासाठी चिकाटी व संयम आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात स्पर्धा परीक्षेत यश मिळविलेल्या क्रांती बेनाडे व तेजश्री गायकवाड यांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. अतिथी व्याख्यानात प्रा. डी. ए. पवार म्हणाले, राज्यशास्त्र विषयात पत्रकारिता, अध्यापन, संशोधन, राजकारण, प्रशासन, समाजसेवा आदी क्षेत्रांत करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा. प्रा. दत्ता जाधव यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सायली वाडकर हिने केले. डॉ. अवधूत टिपुगडे यांनी आभार मानले.

लोकमत
कोल्हापूर, मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी २०२५

# सतीश तांदळे अभ्यास मंडळावर



**कोल्हापूर :** उदयोन्मुख युवा लेखक, अभिनेता व दिग्दर्शक सतीश सदाशिव तांदळे (रा. निवडे, ता. पन्हाळा) यांची विवेकानंद महाविद्यालयातील अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड करण्यात आली. इंग्रजी भाषा व साहित्य हा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी ही निवड करण्यात आली असून, इंग्रजी विषयातील अनेक तज्ज्ञ या अभ्यास मंडळावर आहेत. सतीश तांदळे यांनी दिग्दर्शित केलेला जियारत हा मराठी हिंदी इंग्रजी व ऊर्दू भाषेतील 'साहित्याची प्रेमयात्रा' हा शो राज्यभर गाजत आहे.

पुढारी

कोल्हापूर, मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२५

# मानवातील कौशल्य पूर्णतेमुळे जीआयएस प्रणाली व्यवस्थित काम करू शकते : डॉ. उबाळे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवातील कौशल्य पूर्णतेमुळे जीआयएस प्रणाली व्यवस्थित काम करू शकते, असे प्रतिपादन डॉ. जी. एस. उबाळे यांनी केले. विवेकानंद महाविद्यालय येथे प्राध्यापक प्रबोधनीच्या वतीने आयोजित 'जीआयएस सुदूर संवेदनांचा परिचय आणि उपयोजन'या विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख प्रा. एस. पी. थोरात होते.

व्याख्यानात डॉ. उबाळे यांनी प्रारंभी भूगोलाची व्याख्या सांगून जीआयएस ही संकल्पना स्पष्ट केली. जीआयएसद्वारे भौगोलिक क्षेत्रामध्ये कोणकोणती कामे चालतात याविषयीची उदाहरणे दिली.

प्राध्यापक प्रबोधिनीचे समन्वयक प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रस्ताविक केले. डॉ. डी. बी. दांगट यांनी आभार मानले. प्रा. अश्विनी खवळे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे कार्यक्रमासाठी मार्गदर्शन लाभले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्रा. ए. बी. वसेकर, डॉ. प्रदीप पाटील, रजिस्ट्रार आर. बी. जोग आदी उपस्थित होते.